# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:12.01.2026** **वार:सोमवार**

1. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त पंतप्रधान आज विकसित भारत युवा नेतृत्व संवाद कार्यक्रमात सहभागी होणार
2. सोमनाथचा इतिहास हा आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचा आणि बलिदानाचा इतिहास असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. राज्यभरात महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी; सर्वच प्रमुख पक्षांच्या नेत्यांचा झंजावाती प्रचार आणि
4. न्यूझीलंडविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारताची विजयी सलामी

**<u>पंतप्रधान-युवा दिवस</u>**

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आज राष्ट्रीय युवादिन साजरा केला जात आहहे. या निमित्तानं नवी दिल्लीत आयोजित विकसित भारत युवा नेतृत्व संवाद कार्यक्रमाच्या समारोप सत्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सहभागी होणार आहेत. देशभरातून तसंच विविध अन्य देशांमधून आलेल्या तीन हजार तरुणांशी ते संवाद साधतील. काही निवडक सहभागी यावेळी पंतप्रधानांसमोर सादरीकरण करणार असून राष्ट्रीय महत्वाच्या प्रमुख क्षेत्रांबाबत युवा-आधारित दृष्टिकोन आणि उपयुक्त कल्पना सांगतील.

**<u>पंतप्रधान-सोमनाथ मंदिर</u>**

सोमनाथ मंदिराचा इतिहास हा आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाचा आणि बलिदानाचा इतिहास असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल केलं. गुजरातमध्ये प्रभास पट्टट इथं सोमनाथ स्वाभिमान पर्वाच्या निमित्तानं झालेल्या सभेला त्यांनी संबोधित केलं. देश विभाजनाचा कट रचणाऱ्या सर्व शक्तींवर मात करण्याचं; तसंच विकसित भारताच्या उद्देशासाठी खांद्याला खांदा लावून पुढे जाण्याचं आवाहन त्यांनी केलं. यावेळी बोलताना ते म्हणाले....

**एक हजार साल बाद भी सोमनाथ महादेव के मंदिर पर फहरा रही ध्वजा पूरी सृष्टि का आह्वान कर रही है। प्रभास पाटन तीर्थ की मिट्टी का कण-कण, शौर्य, पराक्रम और वीरता का साक्षी है। सोमनाथ के इस स्वरूप के लिए कितने ही शिव भक्तों ने, संस्कृति के उपासकों ने, संस्कृति के ध्वज धारकों ने अपने प्राणों की आहुति दी है।**

**<u>जिजाऊ जयंती-बुलडाणा</u>**

छत्रपती शिवरायांना स्वराज्याचं बाळकडू देणाऱ्या राजमाता जिजाऊ यांची आज जयंती आहे. या निमित्तानं, बुलडाणा जिल्ह्यातल्या खामगाव इथून संस्कार ज्योत रथयात्रा काल मातृतीर्थ सिंदखेडराजाकडे रवाना झाली. अहिल्या, सावित्री, रमाई संस्कार ज्योती यात्रा; या नावानं निघालेली ही रथयात्रा, सर्वधर्म समभावाचा संदेश देत आहे. राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्त आज राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>महाराष्ट्र प्रचार</u>**

राज्यातल्या 29 महानगरपालिकांचा प्रचार संपण्यासाठी आता फक्त दोन दिवस राहिले आहेत. त्यामुळे काल रविवारच्या सुटीची पर्वणी साधत सर्वच पक्षांच्या प्रामुखी नेत्यांनी राज्यभर झंजावाती प्रचार केला.

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'संवाद पुणेकरांशी' या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्याच्या विकासाचा आराखडा मांडला. पुणे हे केवळ एक शहर नसून महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचं इंजिन आहे.

आम्ही 'पुणे ग्रोथ हब' ही संकल्पना राबवत आहोत. पुण्याचा विस्तार, संधी आणि वाढतं नागरीकरण लक्षात घेऊन पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरडीए परिसराचा एकात्मिक विकास केला जाईल असं मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी काल पिंपरी चिंचवडमध्ये भोसरी परिसरात काल रोड शो देखील केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल पिंपरी चिंचवड महापलिकेसाठी दोन्ही राष्ट्रवादी पक्षांचा जाहीरनामा काल प्रकाशित केला. यामध्ये शहरातील आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा याबरोबरच दररोज पिण्याचे पाणी, खड्डेमुक्त आणि प्रदूषणमुक्त शहर अशा विविध मुद्दयावर भर देण्यात आला आहे.

मुंबई महापालिका निवडणूकीसाठी महायुतीचा वचननामा काल मुंबईत प्रकाशित करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष केंद्रीय राज्य मंत्री रामदास आठवले यावेळी उपस्थित होते. कचरामुक्त मुंबईसह मुंबईचा पाणी प्रश्न मिटवून मिठी नदी स्वच्छ करण्याचं काम केलं जाईल असं फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. तर बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वैद्यकीय विद्यापीठ तयार करणार, तसंच लघु उद्योजकांना पाच लाख रुपये बिनव्याजी कर्ज देणार असल्याचं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी काल मुंबईत शिवाजी पार्क इथं संयुक्त जाहीर सभा घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी सत्ताधारी भाजपावर जोरदार टीका केली. सर्वपक्षीय मराठी माणसांनी राजकीय मतभेद बाजूला सारून एकत्र यावं असं, आवाहन राज ठाकरे यांनी केलं. तर मुंबईला महाराष्ट्रापासून तुटू देणार नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी काल नाशिकमध्येही प्रचारसभा घेतली. आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधे तीस हजार कोटी रुपयांची कामं केली जाणार असून नाशिकच्या भविष्याचा विचार करून विकास केला जाईल, असं ते म्हणाले. छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेनेचे नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रचार सभा झाली. भाजपचे नेते मंत्री नितेश राणे तसंच एआयएमआयएमचे नेते अकबरउद्दीन ओवेसी यांच्या प्रचार सभाही काल झाल्या.

नागपूर महानगरपालिकेसाठी भाजपानं काल चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीरनामा प्रसिद्ध केला. नागपूर जागतिक दर्जाचं शहर बनवण्यासाठी ई- लायब्ररी, 4 स्तरीय वाहतूक, स्कायबस सुविधा, आणि विविध ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याचं आश्वासन जाहीरनाम्यात दिलं आहे. भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल चंद्रपूरमध्ये विजय संकल्प यात्रा केली. धुळे महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारात काल सर्वपक्षीय उमेदवारांनी जोर लावला.

लाडकी बहीण योजनेला काँग्रेसचा विरोध नाही, पण निवडणुका जिंकण्यासाठी भाजपा लाडक्या बहिणींचा वापर करून घेत आहे अशी टीका, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवर यांनी काल अकोल्यात केली. निवडणुकीतल्या आरक्षणाची 50 टक्क्यांची मर्यादा ओलांडून निवडणुका घेण्यावरूनही त्यांनी राज्य सरकार आणि निवडणूक आयोगावर निशाणा साधला. सांगलीमध्ये उमेदवारांनी काल सभा, पदयात्रा, कोपरा बैठका आणि घरभेटींवर भर दिला.

**कीर्तन संध्या- रत्नागिरी**

रत्नागिरीतल्या पंधराव्या कीर्तनसंध्या महोत्सवाचा समारोप काल झाला. विद्यावाचस्पती हरिभक्तिपरायण चारुदत्तबुवा आफळे यांनी या महोत्सवात मार्गदर्शन केलं. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**कीर्तन म्हटलं, की डोळ्यांसमोर येणाऱ्या सर्व रूढ कल्पनांना छेद देणाऱ्या अशा या रत्नागिरीतल्या भव्य महोत्सवाचं यंदा पंधरावं वर्ष होतं. दररोज चार तास असे सहा दिवस चाललेल्या या महोत्सवात रोज सुमारे साडेचार ते पाच हजार जणांनी श्रवणानंद घेतला. यात तरुणांची संख्या मोठी असते हे विशेष. उपासनेच्या सामर्थ्यापासून लष्करी सामर्थ्यापर्यंत, आदर्श पालकत्वापासून वैज्ञानिक प्रगतीपर्यंत, नैतिक मूल्यांपासून देशभक्तीपर्यंत आणि संगीतातल्या रागांपासून काव्यातल्या नवरसांपर्यंत वैविध्यपूर्ण विषयांवर आफळेबुवा करत असलेलं रसाळ, सांगीतिक सादरीकरण**

**साऱ्यांना अंतर्मुख होऊन चिंतन करायला लावतं. म्हणूनच हा महोत्सव म्हणजे मनांची मशागत करणारं एक विद्यापीठ बनलं आहे.आकाशवाणी बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी**

**निधन-सोनग्रा**

ज्येष्ठ साहित्यिक आचार्य रतनलाल सोनग्रा यांच काल दुपारी वृद्धपकाळाने पुण्यात निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. साहित्य आणि संस्कृती मंडळाचे ते माजी अध्यक्ष होते. बौद्ध साहित्य आणि मानवतावादी समाजसुधारकांच्या कार्यावर आधारित साहित्याची निर्मिती त्यांनी केली. त्यांच्या पार्थिव देहावर आज अंत्यसंस्कार होणार आहेत.

**माजी आमदार पटणे निधन- नांदेड**

माजी आमदार गंगाधर पटणे यांचं काल सकाळी नांदेडमध्ये वृद्धापकाळानं निधन झाल. ते 85 वर्षांचे होते. दिवंगत पटणे यांनी देहदानाचा संकल्प केला असल्यामुळे त्यांचा देह नांदेड इथंल्या श्री गुरुगोविंद सिंघजी वैद्यकीय महाविद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आला. बिलोली नगरपरिषदेचे ते नगराध्यक्ष होते. 1998 ते 2004 या कालावधीत त्यांनी विधान परिषद सदस्य म्हणून काम केल. ग्रंथालय चळवळीत त्यांचं मोठं योगदान होत. राजकारण, समाजकारण, पत्रकारिता अशा सर्वच क्षेत्रात ते कार्यरत होते.

**क्रिकेट**

भारतीय क्रिकेट संघाने नवीन वर्षातल्या आपल्या पहिल्या मालिकेची सुरुवात विजयाने केली. न्यूझीलंडविरुद्ध काल झालेल्या मर्यादित षटकांच्या पहिल्या सामन्यात पाहुण्या संघानं दिलेलं 301 धावांचं लक्ष्य भारताने 4 गडी राखून पार केलं. या विजयासह भारताने तीन सामन्यांच्या मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. 93 धावांची खेळी करणाऱ्या विराट कोहलीला सामनावीर घोषित करण्यात आलं. कर्णधार शुभमन गिलने 56 तर श्रेयस अय्यरने 49 धावा केल्या. भारताकडून मोहम्मद सिराज, हर्षित राणा आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी 2 तर कुलदीप यादवने एक बळी घेतला.

**हवामान**

राज्यात थंडीचा कडाका कायम आहे. अहिल्यानगर इथं काल सर्वात कमी; 8 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. येत्या 24 तासात विदर्भ आणि मराठवाड्यात कोरडं हवामान असेल. तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार